# मुमूक्षूसाठी

प. पू. योगीराज श्रीसद्‌गुरु सिद्धीयोगेश्वर महाराज यांचा आध्यात्मिक अभ्यास प्रत्यक्ष अनुभवावर आधारीत आहे. अंधश्रद्धा व अध्यात्मिक रुढीविषयी समाजात गैरसमज आहेत, आणि त्यामुळे समाज दुःख भोगीत आहे. दुःखाने व निराशेने पिडीत, अंधारात चांचपडत असलेल्या समाजाला तसेच भाविकांना योग्य मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य त्यांच्या वाणीत, लेखणीत तसेच आशिर्वादांत आहे.

'भक्तजन' मासिकाच्या वाचकांसाठी 'मुमूक्षूंसाठी' या सदराखाली त्यांनी लेखन करून भक्तजनांना आध्यात्मिक ज्ञानाचे मार्गदर्शन करावे असा आम्ही आग्रह धरला; म्हणून त्यांनी लोककल्याणास्तवच लेखणी हातात धरली.

महाराज स्वतः आत्मसाक्षात्कारी सिद्ध पुरुष असूनही, प्रसिद्धीपासून नेहमी दूर असतात त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा मुमूक्षूंना अवश्य फायदा होणार आहे. असा आम्हाला विश्वास वाटतो.

—— संपादक



प. पू. सद्‌गुरु श्रीसिद्धयोगेश्वर महाराज

या विश्वातील प्रत्येक प्राणिमात्रांचे जीवन गर्भ-जन्म - बाल्य - तारुण्य - वृद्धत्व - मृत्यु या अवस्थेत प्राप्त होणाऱ्या आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक या त्रिविध दुःखांच्या समुहांनी भरलेले आहे. यांतून सुटका होऊन सुख प्राप्त व्हावे यासाठीं प्रत्येक प्राणिमात्र अविरत प्रयत्नशील असतो.

केव्हां केव्हां त्याने सुख प्राप्तिसाठी केलेल्या प्रयत्नांना यश आल्यासारखे दिसत असले तरी सुद्धा अनेक वेळेला त्याने केलेले प्रयत्न विफल होवून, मनुष्य दुःखी झालेला दिसतो. जी जी वस्तु मनुष्याला प्रथमतः प्रिय वाटते, ती ती वस्तु त्याला प्राप्त झाल्यावर; जरी क्षणैक सुखाची प्राप्ति होत असली, तरीसुद्धा त्या प्राप्त झालेल्या सुखांत

धन्य माय व्याली सुकृताचे फळ। फळ ते निर्फल हरिवीण ॥